|| श्री गणेशाय नमः ||
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२८४ ■ शुक्रवार १७ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26


बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

## सोनम वांगचुक यांच्या आंदोलनास व्यापक पाठिंबा खालावलेल्या प्रकृतीबाबत उच्च न्यायालयाचे निर्देश

**कोल्हापूर, दि. १६ : नीट परीक्षा पेपरफुटी संदर्भात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीत उपोषण करत असलेले पद्मश्री पुरस्कार विजेते सोनम वांगचुक यांना कोल्हापूरच्या गोकुळ कामगार संघटनेने पाठिंबा दिला आहे. गोकुळ दूध संघाच्या मुख्य कार्यालय (ताराबाई पार्क) आणि शिरोली येथील ऑफिसच्या गेटवर कामगारांची जाहीर गेट मीटिंग घेऊन केंद्र सरकारच्या उदासीन भूमिकेचा तीव्र निषेध केला. सोनम वांगचुक १९ दिवसांपासून दिल्लीतील जंतर-मंतर येथे उपोषण करत असून त्यांचे नऊ किलो वजन घटले आहे. केंद्र सरकार या आंदोलनाकडे जाणीवपूर्वक**



**दुर्लक्ष करत असल्याचा आरोप कामगार संघटनेने केला. दरम्यान, निरनिराळ्या क्षेत्रातील सुमारे एक हजार आठशे पेक्षा अधिक मान्यवर व्यक्ती आणि संघटनांनी वांगचुक यांच्या आंदोलनास पाठिंबा दिला आहे. सरकारने त्यांच्या आंदोलनाची दखल घेतली पाहिजे, असा सूर सर्वांनी लावत केंद्र सरकार टीका केली आहे. तर दिल्ली उच्च न्यायालयाने वांगचुक यांच्या खालावलेल्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त करीत त्यांच्या प्रकृतीची काळजी घेण्याचे निर्दे श दिले आहेत.**

संघटनेचे जनरल सेक्रेटरी शाहीर निकम म्हणाले, देशामध्ये विविध ज्वलंत प्रश्नांवर शांततापूर्ण मार्गाने आंदोलने सुरू आहेत. केंद्रातील सरकार आंदोलनकर्त्यांची विचारणा करत नाही, ही अत्यंत खेदजनक आणि लोकशाहीला मारक गोष्ट आहे. तेवीस विद्यार्थ्यांच्या आत्महत्येनंतरही सरकार ढिम्म असल्याचा दावा करण्यात येत आहे. संघटनेचे शहाजी भोसले यांनी सरकारवर तोफ डागली. नीट परीक्षेतील घोळामुळे मनस्ताप सहन करावा लागल्याने देशातील तब्बल २३ हून अधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. मोठी जिवितहानी होऊनही सरकार हा विषय गांभीर्याने घेत नाही, असे म्हणत त्यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेचा तीव्र निषेध केला. (पान ४ वर)



## वीज बीलाची माफी अदानीसाठी- सपकाळ

मुंबई, दि.१६- शेतकरी कर्जमाफीची घोषणा केलेली असली तरी अद्याप कर्जमाफी झालेली नाही तरीही स्वतःची पाठ थोपटून घेण्याचे काम सुरु आहे तर दुसरीकडे शेतकऱ्यांना वीजबील माफ केल्याची घोषणा करण्यात आली आहे, ही घोषणाही फसवी व दिशाभूल करणारी आहे. वीज बील माफीची घोषणा ही शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी नाही तर लाडका उद्योगपती अदानीसाठी केलेली आहे. भाजपा सरकारला एमएसईबी च्या चारही विभागाचे खाजगीकरण करून ते अदानीला आंदण द्यायचे आहे, त्याच्या फायद्यासाठी ही घोषणा आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ (पान ४ वर)

## शहादा सुतगिरणी लिलावाच्या बातम्या व चर्चा संचालकांची भुमीका अस्पष्ट: शनिवारी बैठक

**शहादा, दि.१६ (प्रतिनिधी)- तालुक्यातील उंटावद-होळ येथील लोकनायक जयप्रकाश नारायण सहकारी सूतगिरणीच्या संभाव्य लिलावाबाबत सभासद, शेतकरी व कामगारांमध्ये वाढत्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर दि.१८ जुलै शनिवार सायंकाळी ४ वाजता लोणखेडा बायपास रस्त्यावरील शिव प्लाझा लॉन्स येथे चिंतन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.**

यावेळी पाटील यांनी सांगितले की, लोकनायक जयप्रकाश नारायण सहकारी सुतगिरणीचा संभाव्य लिलावा बाबत वृत्तपत्र तसेच सोशल मीडियावर जाहिराती प्रसिद्ध झाल्यानंतर सभासदांकडून संचालक मंडळाकडे वेळोवेळी भूमिका स्पष्ट करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, अद्याप विद्यमान संचालक मंडळाकडून कोणतीही ठोस भूमिका जाहीर करण्यात आलेली नसल्याने सभासद, शेतकरी आणि हितचिंतकांमध्ये नाराजीचे वातावरण असल्याचे त्यांनी सांगितले. तत्कालीन समाजधुरिणांच्या मार्गदर्शनातून आणि समाजाच्या योगदानातून उभारण्यात आलेल्या या सहकारी सूतगिरणीचे बारा हजार सभासद असून अनेक कामगार आहेत. या सूतगिरणीच्या भवितव्याबाबत सविस्तर चर्चा करून पुढील दिशा निश्चित करण्याच्या उद्देशाने ही बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीस सूतगिरणीचे सर्व सभासद, शेतकरी, कामगार तसेच सूतगिरणीच्या अस्तित्वाबाबत संवेदनशील असलेले सर्व हितचिंतक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अभिजीत पाटील यांनी केले आहे.

गिरणीच्या लिलावाबाबत चेअरमन व विद्यमान संचालक मंडळाने खुलासा करणे अपेक्षित होते. परंतु त्यांनी खुलासा केला नसल्याने परिसरातील शेतकरी सभासद व कामगारांमध्ये असंतोष आहे. लिलाव होऊ नये यासाठी चिंतन बैठक आयोजित केली आहे. बैठकीला शेतकरी सभासद कामगार व सुतगिरणीसाठी आर्थिक योगदान देणाऱ्या नागरिकांसोबतच विद्यमान संचालक मंडळानेही उपस्थित राहावे.असे आवाहन शहादाचे नगराध्यक्षअभिजीत पाटील नगराध्यक्ष, शहादा यांनी केले आहे.

## गंगामाई फार्मसी कॉलेजचा संबंध नाही हॅकर्सचा प्रताप- डॉ. वैभव जगताप

**धुळे, दि.१६- नगाव येथील गंगामाई कॉलेज ऑफ फार्मसीच्या नावाचा गैरवापर करून हॅकर्सने नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर डल्ला मारला आहे. कॉलेजचे शिष्यवृत्ती पोर्टलचे बनावट अकाउंट करून बोगस माहिती भरल्याने ३ लाख ८९ हजार ४०० रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मात्र या संपूर्ण प्रकरणाशी गंगामाई कॉलेजचा कोणताही संबंध नसल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव जगताप यांनी दिली.**

उच्च शिक्षण विभाग जळगावचे सहसंचालक पराग मसराम यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात कॉलेजच्या लॉगिनचा वापर करून ४४ बोगस विद्यार्थी दाखवून शिष्यवृत्ती लाटण्यात आली. याप्रकरणी देवपूर पश्चिम पोलीस ठाण्यात क्र. ०२०१ दाखल करण्यात आला आहे.

प्राचार्य डॉ. जगताप यांनी सांगितले की, हॅकरर्सने जे कोर्से स भरलेले आहेत ते अनधिकृत आहेत. विशेष म्हणजे हॅकर्सने भरलेले कोर्सेस हे गंगामाई कॉलेजमध्ये नाहीत. (पान ४ वर)

## वीस जुलैला जि.स्तरीय महिला लोकशाही दिन

नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील समस्याग्रस्त आणि पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन त्यांना तातडीने न्याय मिळावा यासाठी शासन निर्णयानुसार दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरावर ममहिला लोकशाही दिनफ आयोजित केला जातो. त्यानुसार, चालू जुलै महिन्यात दि.२० जुलै, २०२६ रोजी दुपारी १:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील रंगावली सभागृह येथे महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (पान ४ वर)

## अमरीशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूलच्या मुलींना जि.स्तरीय फुटबॉल स्पर्धेत अजिंक्यपद

**शिरपूर, दि.१६- जिल्हा क्रीडा कार्यालय, धुळे तसेच जिल्हा फुटबॉल संघटना, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सुब्रोतो जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित अमरीशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल, शिरपूर येथील १७ वर्षांखालील मुलींच्या फुटबॉल संघाने अप्रतिम खेळाचे प्रदर्शन करत जिल्हा अजिंक्यपद पटकावले. उत्कृष्ट सांघिक समन्वय, शिस्त, वेगवान खेळ आणि जिद्दीच्या बळावर संघाने संपूर्ण स्पर्धेत प्रतिस्पर्धी संघांवर**



**वर्चस्व राखत विजेतेपदावर आपले नाव कोरले.**

जिल्ह्यातील विविध शाळांमधील बलाढ्य संघांचा सहभाग असलेल्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत अमरीशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूलच्या विद्यार्थिनींनी सुरुवातीपासूनच आत्मविश्वासपूर्ण खेळाचे दर्शन घडविले. प्रत्येक सामन्यात (पान ४ वर)

## सेंधवा येथील पर्यटकांवर पाळणा चालकाच हल्ला; फिर्याद घेण्यास टाळाटाळ

**शिरपूर, दि.१६- शिरपूर शहरातील गार्डन परिसरात बुधवारी संध्याकाळी किरकोळ वादातून कायदा-सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले. मध्य प्रदेशातील सेंधवा येथून आलेल्या पर्यटक कुटुंबावर पाळणा चालकाच्या**



**गुंडांनी चाकू आणि लोखंडाच्या पाईपने अत्यंत क्रूरपणे हल्ला केला. या रक्ताळलेल्या थरारात दोन जण गंभीर जखमी झाले असून, महिला, वृद्ध आणि १५ वर्षांच्या बालकालाही बेदम मारहाण करण्यात आली. सर्व जखमींना तातडीने धुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले आहे.**

तिकीट वादातून घातपात

पीड़ित कुटुंबातील १३ सदस्य शिरपूर गार्डनमध्ये आले होते. पाळण्याच्या तिकिटावरून चालकाने आधी हुज्जत घातली आणि कुटुंब बाहेर पडत असतानाच पूर्वनियोजित कट रचून दबा धरून बसलेल्या टोळक्याने त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. (पान ४ वर)

## तापी नदीच्या पात्रात दोघांचे मृतदेह सापडले तरूणाच्या नातेवाईकांचा पोलीस ठाण्यात ठिय्या

**धुळे, दि. १६ (प्रतिनिधी) : जिल्ह्यातील शिरपूर जवळील गिधाडे येथे तापी नदी पुलावरून उडी घेऊन अहिल्यापूर येथील अठ्ठावीस वर्षीय संदीप उदेसिंग गिरासे या तरुणाने आत्महत्या केली आहे. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने तापी पुलावरून एक भावनिक आणि गंभीर आरोप करणारा व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारीत केला होता. दोन दिवसांपूर्वी त्याने नदीत उडी घेतली होती. आज सकाळी त्याचा मृतदेह तापी नदीपात्रात आढळून आला. या घटनेनंतर संतप्त नातेवाईकांनी शिरपूर शहर पोलीस ठाण्याबाहेर ठिय्या आंदोलन केले. संदीपच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्या आरोपींना अटक केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा घेतला. दरम्यान, तापी नदीच्या पात्रात आज दुपारी धुळ्यातील पन्नास वर्षीय संजय मोतीलाल भांडारकर या पन्नास वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळला.**

समाजमाध्यमांवर प्रसारीत झालेल्या व्हिडिओमध्ये संदीपने आपण काम करत असलेल्या टेक्सटाईल पार्क कंपनीत आपल्यावर अन्याय झाल्याचे म्हटले आहे. कंपनीत त्याच्यासोबत काम करणाऱ्या दोन मुलींनी आपल्यावर खोटा गुन्हा दाखल केल्याचा आरोप त्याने केला. या प्रकरणानंतर कंपनीच्या मालकांनी आणि प्रशासनाने त्याला कामावरून काढून टाकले होते. कंपनीत परप्रांतीय लोकांना वाचवले जाऊ शकते. मात्र, महाराष्ट्राच्या स्थानिक तरुणाला न्याय दिला जात नाही, अशी उद्विग्न भावनाही संदीपने व्हिडिओत मांडली होती. तापी पुलावर संदीपचा मोबाईल, मोटरसायकल आणि चप्पल पोलिसांना आढळून आली होती. दोन दिवस स्थानिक प्रशासन आणि पट्टीचे पोहणारे नदीपात्रात त्याचा शोध घेत होते. अखेर आज (पान ४ वर)


## श्री जगन्नाथ रथयात्रेचे नंदुरबार येथे आयोजन

नंदुरबार, दि.१६- आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन), नंदुरबार यांच्या वतीने दि. १८ जुलै २०२६ रोजी श्री जगन्नाथ रथयात्रेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

रथयात्रेला दुपारी दोन वाजता प्रारंभ होणार असून, मोठा मारुती, जलका बाजार, सोनार गल्ली, सोनार खुंट, महाराष्ट्र व्यायामशाळा, हाट दरवाजा, गांधी पुतळा, नेहरू चौक , नगर पालिका, आमदार कार्यालय, अंधारे चौक आदी मार्गाने रथयात्रा मार्गक्रमण करत सायंकाळी सात वाजता संजय टाऊन हॉल येथे समारोप होणार आहे. यावेळी सायंकाळी ७.१५ वाजता प्रवचन व कथा, रात्री ९.३० वाजता (पान ४ वर)

## कुणाल पाटील यांचा निराधारांना आधार हयातीच्या दाखल्याचे मोफत वाटप

**धुळे, दि.१६- धुळे ग्रामीणचे मा.आ.कुणाल पाटील यांच्या पुढाकाराने तालुक्यातील तब्बल १७१९ निराधार लाभार्थ्यांनी संजय गांधी निराधार योजनेकरीता मोफत ह्यातीच्या दाखल्याचा लाभ घेतला. त्यामुळे आर्थिक भार कमी होवून निराधार लाभार्थ्यांना मा.आ.पाटील यांच्या प्रयत्नांमुळे आधार मिळाला आहे. विनामूल्य सुविधा उपलब्ध करुन दिल्याबद्दल तालुक्यात समाधान व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान ही सुविधा शासनाच्या अंतिम मुदतीपर्यंत सूरु राहणार असल्याचे मा.आ.कुणाल पाटील यांनी सांगितले आहे.**



शासनाच्यावतीने संजय गांधी योजना तसेच इतर वैयक्तीक लाभाच्या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना हयातीचा दाखला बंधनकारक केला आहे. त्यासाठी मा.आ.कुणाल पाटील यांनी त्यांच्या धुळे शहरातील संपर्क कार्यालयात हयातीचा दाखला मोफत तयार करुन देण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यांच्या या उपक्रमाला धुळे तालुक्यातील लाभार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. संजय गांधी निराधार अनुदान योजना,श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना यांच्यासह वैयक्तीक लाभाच्या अनुदान योजनेसाठी पात्र लाभार्थ्याचा हयातीचा दाखला संबधित विभागाला दरवर्षी द्यावा लागतो. सदर दाखला काढण्यासाठी ज्येष्ठ नागरीक, वयोवृध्द नागरीक, दिव्यांग बांधव, तसेच माता बघिनींना स्वत: हजर रहावे लागते, यासाठी वेळा आणि पैसाही खर्च होतो. अनेकवेळा त्यांची आर्थिक फसवणूक व पिळवणूकही होते. त्याप्रमाणे दिव्यांग तसेच वयोवृध्दांना शारिरिक व मानसिकही त्रास सहन करावा लागतो. अनेकवेळा कागदपंत्रांअभावी लाभार्थ्यांना चकराही माराव्या लागतात. त्यामुळे हा सर्व त्रास वाचावा म्हणून धुळे ग्रामीणचे मा.आ.कुणाल पाटील यांनी पात्र लाभार्थ्यांना हयातीचा दाखला मोफत (पान २ वर)

## हस्ती वर्ल्ड स्कूलमध्ये शिक्षकपालक समिती

दोंडाईचा, दि.१६- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती वर्ल्ड स्कूल, दोंडाईचा येथे हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शिक्षकपालक समितीची कारणी ज्ञानदीप येथे बैठक घेत स्थापना करण्यात आली.

यावेळी इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून शिक्षकपालक समितीसाठी अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त अर्जांमधून ईश्वरी चिठ्ठी (लकी ड्रॉ) पद्धतीने सांवी राजेश्वर जयसिघानिया यांची शिक्षकपालक समितीच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

या बैठकीला हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन, शाळेचे प्राचार्य जीवन सपकाळे,प्रशासकीय अधिकारी रेखा गाडेकर, समन्वयिका समिना बोहरी, तसेच पालक वर्ग उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष म्हणून शाळेचे प्राचार्य जीवन सपकाळे तर पालकांची सदस्य म्हणून निवड (पान २ वर)



## अल्पवयीन बालिकेवर अत्याचाराचे धुळ्यात पडसाद; महिलांकडून निषेध

**धुळे, दि.१६- राजस्थान राज्यातील श्रीगंगानगर येथील तेरा वर्षीय अल्पवयीन मुलींवर अत्याचाराची घटना घडली. या घटनेचे पडसाड धुळ्यातही उमटले असून बालिककांसह महिलांची सुरक्षा तसेच अत्याचार करणाऱ्याला कठोर शिक्षा करण्यात यावी. या मागणीचे निवेदन महिला समन्वय समितीने जिल्हाधिकाऱ्यांना दिले.**

निवेदनात नमुद केले आहे की, शाळा, महाविद्यालये, महिला वसतीगृहे, बसस्थानकांवर पोलीसांची नियमित गस्त असावी. शहरातील संवेदनशील परिसरात तातडीने सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवण्यात यावे. अवैध मद्यविक्री, (पान २ वर)

## गुंगीकारक औषध बाळगणाऱ्यास एल.सी.बी.पथकाने केले जेरबंद

**धुळे, दि.१६- मानवी मेंदुवर विपरीत परिणाम घडवून आणणाऱ्या गुंगीकारक औषध कफ सिरप बाटल्या नेणाऱ्या मालेगाव येथील तरुणाला पोलिसांनी अटक केली. स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पथकाने मोराणे येथे कारवाई केली.**

पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी मानवी मेंदुवर विपरीत परिणाम घडवून आणणाऱ्या गुंगीकारक औषध (कफ सिरप) विनापरवानगी कब्जात बाळगणारे व विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचे निर्देश स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना दिले आहेत. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना माहिती मिळाली, त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा धुळे पथकाला रवाना केले. पथकाने मोराणेजवळ संशयीतरित्या शकील सैय्यद दाऊद (वय ३६) रा.नोमाणी नगर, मालेगाव जि. नाशिक यास ताब्यात घेतले.



त्याच्याकडील बॅग मध्ये गुंगीकारक औषध कफ सिरप च्या बाटल्या मिळाल्या. त्या औषधांची किंमत २४ हजार ७३० रुपये असून मुद्देमाल जप्त केला. संशयित शकील सैय्यद याने विनापरवाना विक्रीच्या उद्देशाने गुंगीकारक औषध बाळगले. त्याच्याविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, उपनिरीक्षक अमरजीत मोरे, हवालदार शशिकांत देवरे, मुकेश वाघ, धर्मेंद्र मोहिते, सुशिल शेंडे, विवेक वाघमोडे यांनी कारवाई केली.

## ऑर्केस्ट्राचे हरहुन्नरी कलाकार प्रो.सलीम अन्सारी यांचे निधन

धुळे, दि.१६- शहरातील



एस.एस.व्ही.पी.एस. कॉलेजचे माजी प्रोफेसर डॉ. अन्सारी मोहम्मद सलीम मोहम्मद उस्मान रा. ताशा गल्ली, सुलतानीया चौक धुळे. यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात तीन भाऊ, तीन बहिणी, एक मुलगा, तीन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

धुळे शहरातील कला क्षेत्रातील एक महत्वाचे व्यक्तीमत्व होते.ऑर्केस्ट्रामधील हरहुन्नरी कलाकाल म्हणून त्यांची ओळख होती. देशहिताच्या गाण्यांना ते विशेष महत्व देत असत. संस्थापक तराना ए मोहम्मदी, अजंता आर्ट सर्कल, ऑर्केस्ट्रा मयुर मेलॉडी, ऑर्केस्ट्रा पंचम, संस्थापक भारत गौरव गान, माजी सदस्य महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य एकेडमी मुंबई, नैशनल युथ पुरस्कार, डॉ. बाबा साहेब फेलोशिप पुरस्कार, महाराष्ट्र गौरव पुरस्कार, राष्ट्रीय एकात्मता फेलोशिप पुरस्कार, नैशनल एन्टीग्रेशन पुरस्कार, खान्देश जीवन गौरव पुरस्कार, नैशाद पुरस्कार, बार टू मेडल ऑफ मेरिट पुरस्कार, मेडल ऑफ मेरीट पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार असा विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले होते.

## धुळे जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे कबड्डी दिन मान्यवरांच्या साक्षीने साजरा

**धुळे, दि.१६- धुळे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने कबड्डीचे जनक कबड्डी महर्षी स्व. शंकरराव (बुवा) साळवी यांच्या जयंतीनिमित्त १५ जुलै रोजी कबड्डी दिन मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. चाळीसगाव रोड येथील श्रीकृष्ण लॉन्स येथे झालेल्या या कार्यक्रमास जिल्ह्यातील कबड्डी क्षेत्रातील पदाधिकारी, प्रशिक्षक, पंच, खेळाडू व विविध कबड्डी मंडळांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**




कार्यक्रमाच्या प्रारंभी कबड्डी महर्षी स्व. शंकरराव (बुवा) साळवी यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धुळे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष मा.आ. राजवर्धन कदमबांडे होते. यावेळी कार्याध्यक्ष ड. रवी देसर्डा, सचिव मुजफ्फर अली सय्यद, खजिनदार मनोहर चौधरी, पदाधिकारी आकाश शिंदे ,सत्यजित शिसोदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी गेल्या वर्षभरात धुळे जिल्ह्यात कबड्डी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान (पान ४ वर)

## मोहाडीत किराणा दुकान फोडले

धुळे, दि.१६- मोहाडी परिसरातील दंडेवालाबाबा नगरमध्ये किराणा दुकानाचे शटर कापून चोरट्यांनी तेरा हजार साठ रुपयांचा किराणा माल लंपास केला. रविवारी (ता.१२) मध्यरात्री चोरट्यांनी कटरने शटर कापले, दुकानातून किराणा माल लंपास केला. दुसऱ्या दिवशी घरफोडी झाल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी मालक शामकांत बाबुलाल अमृतकर रा. पवन नगर, धुळे यांनी मोहाडी पोलिसात तक्रार दिली आहे. त्यानुसार घरफोडीचा गुन्हा दाखल झाला. हवालदार चंद्रात्रे तपास करीत आहेत. चोरीच्या घटनेमुळे परीसरात भितीचे वातावरण पसरले आहे.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,30,550 रु.+3% GST
सोने- 24 K -1,42,500 रु.+3% GST
चांदी- 2,26,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

चतुर्थ पुण्यस्मरण



स्व.सुरेशजी जुगराजजी मुथा
(स्वर्गवास दि.१७/७/२०२२)
आप भलेही आज हमसे दूर चले गए परन्तु हमारे दिलों में आज भी जिंदा है । हर पल आपकी याद आती है । आप की पुण्यतिथी पर शत शत नमन..!
-------: श्रद्धावनत्:-------
बाळूभाऊ कांकरियाजी
हरि ॐ ट्रेडर्स, नेहरु चौक, देवपूर, धुळे

# आपला महाराष्ट्र

## सामान्य माणसाला पदपथावरचा अधिकार किती?

आपल्या देशातील फूटपाथ कुठे असतात ते कधीच दिसत नाहीत असंख्य लोकांना राहण्यासाठी घरेच नसल्याने ते बहुतेक फूटपाथवर राहताना. दिसतात. दिल्ली, मुंबई सारख्या शहरात हमखास फूटपाथ त्यांच्या साठीच तयार केले असावेत अशी अवस्था आहे. ते जाणीवपूर्वक रस्ते अडवतात असे नसून देशातील परिस्थिती त्यांना पदपथांवर राहण्यास भाग पाडते.आपण मात्र राहणाऱ्यांच्या नावाने बोंब मारतो. एका चित्रपटात रस्त्यावर झोपलेल्यांना आलिशान वाहन चालविणाऱ्या नशेडीने चिरडण्याचा खटला दाखविण्यात आला. तेव्हा चिरडणाराच्या बाजुने युक्तिवाद करणाऱ्या वकिलांनी सांगितले की, फूटपाथ झोपण्यासाठी नसतात. त्याच वेळी मृत पावलेल्यांच्या बाजूने लढणाऱ्या वकिलांनी युक्तिवाद केला की, फूटपाथ झोपण्यासाठी नसतात पण ते वाहन चालविण्यासाठीही नसतात. फूटपाथवर राहणाऱ्या लोकांनी कुठे जावे ? हा खटला प्रातिनिधीक आहे. व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगणारा आहे.

मोठ्या आणि मध्यम शहरात तर फूटपाथ पोटभरू व्यावसायिकांनी वेढलेले असतात. त्यांना उठता बसता हाकलून दिले जाते त्यांच्या प्रती स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अजिबात सहानुभूती नसते.पण सर्व मिळून सामान्य नागरिकांच्या जीवावर उठलेले असतात. स्वातंत्र्य मिळून जवळपास ऐंशी वर्षे उलटून गेल्यानंतरही नागरिकांना सुरक्षित पदपथावर चालण्याच्या अधिकारासाठी सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठवावे लागतात. असे असल्यास तो आपल्या शहरी विकासाच्या संकल्पनेचा मोठा पराभव आहे. अलिकडेच सर्वोच्च न्यायालयाने पादचाऱ्यांच्या हक्कांना केंद्रस्थानी आणणारा निर्णय दिलेला आहे. तो फार महत्वाचा मानावा लागेल.

धुळ्यात सारख्या मध्यम शहरात रस्त्यावर वाहने मोठ्या प्रमाणावर आली. जेवढी घरे तेवढी वाहने आली आहेत. त्यामुळे रस्त्यावर जी गर्दी होते त्यातून वाट काढत पादचारी इप्सित स्थळी पोहचतात. फूटपाथ तर रिकामाच नसतो. त्यावर लोटगाड्या असतात. वाहने रस्त्यावर लावलेली. परिणामी मिळेल त्या जागेवरून आपले वाहन काढावे लागते यात अपघात ठरलेले असतात. अनेकदा प्रश्न पडतो की, भारतात नागरिकांच्या मूलभूत गरजा समजून घेणारे शहरी नियोजक खरोखर आहेत का ? आणि असले तरी त्यांचे म्हणणे वरिष्ठ नोकरशहा व राजकारणी ऐकतात का ?

जेव्हा काही जागरूक नागरिकांनी कोट्यवधी भारतीय पादचाऱ्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. स्वातंत्र्यानंतर इतकी वर्षे उलटून गेल्यानंतरही सुरक्षित पदपथावर चालण्यासारख्या मूलभूत अधिकारासाठी न्यायालयाचा आधार घ्यावा लागतो, हीच बाब धक्कादायक आहे.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की सुरक्षितपणे पायी चालण्याचा अधिकार हा भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकाराचा भाग आहे. हा निर्णय विशेषतः समाजातील दुर्बल, गरीब, वृद्ध, महिला, दिव्यांग आणि मुलांसाठी आशेचा किरण आहे.

सरकारने काही काळा पूर्वी महागड्या इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अधिक चालण्याचा आणि वाहनांचा कमी वापर करण्याचा सल्ला दिला होता. मात्र प्रत्यक्षात आपल्या शहरांमध्ये पायी चालणे दिवसेंदिवस अधिक धोकादायक होत आहे.

शहरांचा झपाट्याने विस्तार होत असताना मुख्यमंत्री, उद्योगपती आणि प्रशासनाचे लक्ष मोठमोठ्या पायाभूत प्रकल्पांकडे आहे; पण पादचाऱ्यांसाठी सुरक्षित पदपथ उभारण्याकडे मात्र सातत्याने दुर्लक्ष होत आहे. परिणामी, आधीच गर्दीने गुदमरलेल्या शहरांत पायी चालणे अधिकच अवघड झाले आहे. सदोष शहरी नियोजन ही आज सर्व वयोगटांपुढील गंभीर समस्या आहे. अनेक शहरांचे विकास आराखडे वर्षानुवर्षे मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. लोककल्याणापेक्षा सत्तेचे आणि जमिनीच्या व्यवहारांचे राजकारण अधिक महत्त्वाचे ठरत असल्याने नियोजनाची अवस्था बिकट झाली आहे. जमिनीच्या व्यवहारात राजकारणी अग्रक्रमाने असतात.आता अधिकारीही भरपूर आहेत. मागे सातारा जिल्ह्यातील एका प्रकरणात अधिकारी व्यक्तिने गावाला विस्थापितांच्या धाक दाखवून चारशेहून अधिक एकर जमीन लाटली. अर्थातच त्या अधिकाऱ्याला ती बाब महागात पडली.शहरी भागातीव फूटपाथ देखील अशाच प्रकारे कुणीही हक्क प्रस्थापित करू पाहतो.त्यावर कब्जा करतो.ती काहींची दादागिरी असते.

अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय सर्वांनी स्वागतार्ह मानला पाहिजे. आणि स्थानिक प्रशासनाने त्यावर मार्ग काढत हस्तक्षेप केला पाहिजे. २०१५ ते २०२४ या दशकात रस्ते अपघातांतील मृत्यूंमध्ये २० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. वाहतूक सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना होत असल्या तरी पादचाऱ्यांच्या सुरक्षेकडे आवश्यक तेवढे लक्ष दिले गेलेले नाही.

पूर्वीची शहरे आकाराने लहान होती; कर्मचारी कमी होते, तंत्रज्ञान नव्हते, तरीही शहरी व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध होते. पदपथ, स्वच्छ रस्ते, वाहतूक नियंत्रण, सिग्नल व्यवस्था आणि पोलिसांची उपस्थिती अधिक परिणामकारक होती. वाहन परवाने देण्यापूर्वी कठोर चाचण्या घेतल्या जात असत आता तसे काहीही घडत नाही .आज त्याचे स्वरूप बरेच बदलले असून डोळे झाक करून परवाने वाटप करण्यात येतात.नेमून दिलेल्या कामा ऐवजी खिसे भरण्याचे काम मोठ्या प्रमाणावर चालते. त्यामुळे हे खाते सर्वाधिक बदनाम आहे.

अशा एका छोट्या पण अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला याचा अर्थ आपली जबाबदारी म्हणून फारच कमी लोक ती निभावतात.

शहरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि शहर व्यवस्थापन यंत्रणेचे अपयश यास कारणीभूत आहे.

स्वच्छता, अतिक्रमण निर्मूलन, प्रदूषण नियंत्रण, पदपथांचे बांधकाम आणि देखभाल या कामांची जबाबदारी नगर प्रशासनाची आहे. अनेक राज्यांत ही कामे वेगवेगळ्या विभागांकडे असल्याने समन्वयाचा अभाव अधिक प्रकर्षाने जाणवतो.

२०१६ मध्ये स्मार्ट सिटी अभियान सुरू झाले, तेव्हा एका वरिष्ठ अधिकाऱ्याने विचारले होतेखऱ्या अर्थाने स्मार्ट शहर कशाला म्हणायचे त्यावेळी अनेकांनी ‍शहरी सुरक्षितताफ हा सर्वाधिक दुर्लक्षित मुद्दा असल्याचे सांगितले होते.

आज मागे वळून पाहिले असता, स्मार्ट सिटी म्हणून निवडलेल्या शंभर शहरांपैकी एकही शहर शासनाने ठरवलेल्या उद्दिष्टांच्या जवळ पोहोचलेले दिसत नाही. अनेक शहरांत मोठमोठे चौक, उड्डाणपूल आणि सुशोभीकरण झाले; पण पादचाऱ्यांसाठी सलग, सुरक्षित आणि अतिक्रमणमुक्त पदपथ निर्माण करण्याकडे फारसे लक्ष गेले नाही.

संपन्न लोक सकाळी बागांमध्ये फेरफटका मारतात. पण रोजंदारीवर काम करणारे कामगार, वृद्ध नागरिक, वाहन चालवू न शकणाऱ्या महिला, दिव्यांग व्यक्ती, शाळा–कॉलेजात जाणारे विद्यार्थी किंवा बाजारात पायी जाणारे सामान्य नागरिक यांनी कसे वापरावे हा प्रश्नच आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आता राज्य सरकारे, शहरी विकास विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्था पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेकडे गांभीर्याने पाहतील, अशी अपेक्षा आहे. अनेक वर्षांनंतर हा आशावाद लोकांच्या मनात जागा झालेला असला तरी बेजबाबदार लोकांचा काहीच भरवसा नसतो परिणामी हा प्रश्न लटकलेलाच राहील की काय अशी शंकि येते.

फेरीवाले, बेकायदेशीर पार्किंग, बांधकाम साहित्य, वीजखांब, ट्रान्सफॉर्मर आणि जाहिरात फलकांमुळे पादचारी रस्त्यावर उतरतात.प्रत्येक वाहनचालकही प्रवासाची सुरुवात आणि शेवट पायीच करतो; त्यामुळे पादचाऱ्यांचा प्रश्न हा सर्वांचा आहे. सुरक्षित झेब्रा क्रॉसिंगची गरज असताना रस्त्यावर स्पीड ब्रेकरच अधिक दिसतात.त्यामुळे लोक हैराण होतात.या परिस्थितीस

रस्ते विकासाचा चुकीचा दृष्टिकोन उड्डाणपूल आणि रुंद रस्त्यांवर कोट्यवधी रुपये खर्च करणे कारणीभूत ठरते. मात्र पदपथांसाठी पुरेसा निधी राखला जात नाही.

चालण्यायोग्य शहरे म्हणजे कमी प्रदूषण, कमी इंधन वापर आणि अधिक निरोगी नागरिक याबरोबरच पदपथांवर अतिक्रमण झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांची वैयक्तिक जबाबदारी ठरविण्याची गरज निर्माण झालेली आहे. थोडे सरकारला यासाठी कडक व्हावे लागेल.सुरक्षित पदपथ हा केवळ वाहतुकीचा विषय नसून राज्यघटनेतील जीवनाचा आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे ही बाब प्रत्येकाने लक्षात घेतली पाहिजे.सामान्य माणसांना सुखाने जगू द्यायचे नसेल तर तो मुद्दा अलाहिदा.पण तसे व्यवस्थेत असलेल्या लोकांना वाटत असेल तर ते अती मागासलेले समजले पाहिजेत.



## व्हॉईस ऑफ नंदुरबार ही स्पर्धा म्हणजे कलावंतांना हक्काचा मंच- आ.रघुवंशी

**नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी)- व्हॉईस ऑफ नंदुरबार ही स्पर्धा म्हणजे नवोदित गायक कलावंतांसाठी हक्काचा मंच असून येथूनच जिल्ह्यातील प्रतिभावंत कलावंत उदयास येतील असे मत आ.चंद्रकांत रघुवंशी यांनी व्यक्त केले. ते रोटरी क्लब ऑफ नंदनगरी आयोजित व्हॉईस ऑफ नंदुरबारच्या पारितोषिक वितरण समारंभात बोलत होते.**

नंदुरबार जिल्ह्यातील नवोदित गायक कलावंतांसाठी व्हॉइस ऑफ नंदुरबार या कराओके गीत गायन स्पर्धेच्या सहाव्या पर्वाचे आयोजन नंदुरबार येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिर येथे करण्यात आले होते. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डिस्ट्रिक्ट ३०६०चे माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर पिंकीबेन पटेल, हिरा उद्योग समूहाचे प्रमुख डॉ.रविंद्र चौधरी, डी.जी.ई. आशिष पटवारी, उपनगराध्यक्ष प्रथमेश चौधरी, असिस्टंट गव्हर्नर सौरभ मुनोद, मनोज रघुवंशी, किशोर रघुवंशी, सुमुल पटेल, रितू पटवारी, नंदकिशोर सूर्यवंशी, महेश रघुवंशी, विवेक जैन, राहुल पाटील आदी. उपस्थित होते.

व्हॉईस ऑफ नंदुरबार ही स्पर्धा दोन गटात घेण्यात आली. सदर स्पर्धेच्या अंतिम फेरीत मोठ्या गटात २८तर लहान गटात १२ अशा ४०स्पर्धकांची निवड करण्यात आली होती. या स्पर्धेत नंदुरबार जिल्ह्यातील अनेक प्रतिभावंत नवोदित गायकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे परीक्षण चंद्रशेखर चव्हाण व अपेक्षा पवार यांनी केले. तर प्राथमिक फेरीसाठी अजय वळवी व रवी सूर्यवंशी यांनी परीक्षण केले होते. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावर्षी व्हॉईस ऑफ नंदुरबारचा मानकरी विशाल गोपीचंद सपकाळे हा ठरला. तर लहान गटात प्रिती रविंद्र सपकाळे ही मानकरी ठरली. विजेत्यांना आ.चंद्रकात रघुवंशी व मान्यवरांच्या हस्ते अनुक्रमे रुपये १५ हजार व रुपये ७ हजार किमतीचे संगीत साहित्य, आकर्षक गौरवचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तर इतर विजेत्यांना देखील संगीत साहित्य, आकर्षक गौरवचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रोजेक्ट को-चेअरमन किरण दाभाडे यांनी केले तर आभार प्रोजेक्ट चेअरमन नागसेन पेंढारकर यांनी मानले.

विजेच्या स्पर्धकांमध्ये मोठा गट प्रथम - विशाल गोपीचंद सपकाळे, द्वितीय - अनुराग जगदाळे, तृतीय- पंकज सुनील चौधरी, उत्तेजनार्थ- रीता यशवंत गुलाले, उत्तेजनार्थ- गणेश यशवंत बागुल, लहान गट प्रथम- प्रिती रविंद्र सपकाळे, द्वितीय- मनस्वी चंद्रकांत ईशी, तृतीय- सम्राज्ञी अशोक पाडवी, उत्तेजनार्थ- शुभम संदीप वसावे, उत्तेजनार्थ- हर्षदा विश्वनाथ पटेल आदिंचा समावेश आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोटरियन युवराज पाटील, रमाकांत पाटील, डॉ.विशाल चौधरी निलेश तंवर, शब्बीर मेमन. जितेंद्र सोनार, सैय्यद इसरार अली, मन्नाभाई पटेल, आकाश बेदमुथा, फखरुद्दीन जलगणवाला, प्रवीण पाटील, जितेंद्र पाटील. अंकित जैन. राजनसिंग चंदेल, सनी जैन, विकास तोष्णीवाल, युनूस सय्यद, प्रवीण येवले, तूषार रावल, प्रशांत कोटेचा, अंकित ओस्तवाल, पराग शाह, पंकज मराठे, मूर्तझा वोरा, ॲड.प्रेमानंद इंद्रजित, संदीप रंगलानी, मिलिंद पहुरकर आदींनी परिश्रम घेतले.



## रनाळे येथे नालेसफाई कामांचा शुभारंभ

धुळे, दि.१६-नंदुरबार तालुक्यातील रनाळे येथे लोकनेते अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त जनसेवा सप्ताहअंतर्गत नाले साफसफाई कामाचे शुभारंभ प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

डॉ अभिजित मोरे जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नंदुरबार यांच्या संकल्पनेतून नंदुरबार जिल्ह्यात लोकनेते अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्त नंदुरबार तालुक्यातील रनाळे गावात जनसेवा चा कार्यक्रम अंतर्गत नदी नाले सफाई अभियान राबविण्यात आले तसेच वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस मधुकर पाटील ह्यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आले. यावेळी नंदुरबार तालुका अध्यक्ष डॉ. योगेश पाटील, जेष्ठ नेते नंदुरबार विधानसभा प्रमुख के.बी. पाटील, मोहन ढोणे, सागर पाटील, मनोज चौधरी. राजू पवार, रनाळा ग्रामपंचायत सदस्य सुरेश भाबड, गायत्री कदमबांडे, दीपाली तांबोळी, धीरज पाटील, डॉ. जगदीश चौधरी, नारायण पाटील, रमेश ठाकरे, सुनील भोई, नईश्वर भोई, बबलू कदमबांडे, दिलीप हिरजी ताबोळी आदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा चे कार्यकर्ते उपस्थित होते.

## महा.कला शिक्षक संघ प्रदेश उपाध्यक्ष भदाणेंचा कुणाल पाटलांच्या हस्ते सत्कार



**धुळे, दि.१६- महाराष्ट्र राज्य कला शिक्षक संघाचे प्रदेशाध्यक्ष प्रल्हाद शिंदे, प्रदेश सचिव प्रल्हाद साळुंखे तसेच राज्य कार्यकारिणीतील सर्व पदाधिकाऱ्यांच्या मान्यतेने राजेंद्र (अजय) साहेबराव भदाणे यांची महाराष्ट्र राज्य कला शिक्षक संघाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल धुळे ग्रामीणचे मा.आ. कुणाल पाटील यांच्या हस्ते त्यांचा शुभेच्छापत्र देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.**

राजेंद्र भदाणे हे धुळे जिल्ह्यातील उत्कृष्ट कला शिक्षक, प्रतिभावान कलावंत, चित्रकार, पत्रकार, प्रभावी लेखणीचे धनी, संघटन कौशल्य लाभलेले नेतृत्व, तसेच आर.एस.पी. (रस्ता सुरक्षा पथक) चे जिल्हा समादेशक म्हणून कार्यरत आहेत. ते जवाहर शिक्षण प्रसारक संस्थेच्या माध्यमिक विद्यालय, अजंग येथील मुख्याध्यापक असून, जिल्हा व राज्यस्तरीय अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये कला विषयाची आवड निर्माण करून त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी त्यांनी सातत्याने उल्लेखनीय कार्य केले आहे. विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना कलेचे धडे देत त्यांना विविध स्पर्धांमध्ये यशस्वी होण्यासाठी प्रेरित केले आहे. त्यांच्या या शैक्षणिक, सामाजिक व संघटनात्मक कार्याची दखल घेत त्यांची प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीबद्दल माजी आमदार कुणालजी पाटील यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच जवाहर शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष भगवान गर्दे, सचिव विजय देवरे, संस्थेतील सर्व पदाधिकारी, शिक्षक, मुख्याध्यापक, गोंदूर गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी राजेंद्र भदाणे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या.

## मनपा कर वसुलीचे काम थंडावले मालमत्ता कराचे अवधे ४७ को.वसुल

**धुळे, दि.१६- धुळे महानगरपालिकेच्या मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीचा वेग अत्यंत मंदावल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात शहरातील मालमत्ताधारकांकडे मालमत्ता करापोटी सुमारे १३४ कोटी रुपये येणे होते. मात्र मार्च २०२६ अखेरपर्यंत केवळ ४७ कोटी रुपये वसूल झाले असून ही वसुली अवघी ३५ टक्के आहे.**

त्याचप्रमाणे पाणीपट्टीच्या वसुलीची स्थितीही समाधानकारक नसल्याचे दिसून येते. गेल्या वर्षभरात महानगरपालिकेने विविध वेळा अभय योजना व शास्ती सवलत जाहीर करूनही अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. जानेवारी २०२६ पासून देवपूर व शहरपेठ भागासाठी स्वतंत्र वसुली अधीक्षकांची नेमणूक करण्यात आली. मात्र त्यानंतरही पाणीपट्टीची वसुली केवळ ११ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहिल्याचे समोर आले आहे. चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये मागील थकबाकीसह शहरातील मालमत्ताधारकांकडे १८४ कोटी ९९ लाख रुपये मालमत्ता कराची थकबाकी आहे. त्यापैकी १५ जुलै २०२६ पर्यंत केवळ १५ कोटी ६० लाख रुपये वसूल झाले आहेत. तर पाणीपट्टीची मागील थकबाकीसह ५३ कोटी ९० लाख रुपये येणे असून त्यापैकी केवळ १ कोटी २८ लाख रुपये वसूल करण्यात आले आहेत. सध्या मालमत्ता कर वसुलीसाठी महानगरपालिकेने चार वसुली अधीक्षक आणि सुमारे ४० कर्मचारी नियुक्त केले आहेत. मात्र एवढे मनुष्यबळ उपलब्ध असूनही अपेक्षित वसुली होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, सन २०२२ ते २०२५ या कालावधीत केवळ एक वसुली अधीक्षक असतानाही महानगरपालिकेची सुमारे ६० टक्के वसुली झाली होती. त्यामुळे आता चार अधीक्षक असताना वसुली सुमारे ९०% पर्यंत पोहोचणे अपेक्षित असल्याचे मत व्यक्त होत आहे.

पान १ वरुन

## कुणाल पाटील यांचा निराधारांना आधार

वितरणाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. मा.आ.कुणाल पाटील यांचे संपर्क कार्यालय, जिजामाता हायस्कूल शेजारी प्रांत कार्यालयासमोर धुळे येथे हयातीचा दाखला तयार करून दिला जात आहे. हयातीचा दाखला मोफत आणि सहज उपलब्ध होत असल्याने लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. दरम्यान या उपक्रमामुळे मा.आ.कुणाल पाटील यांनी निराधारांना आधार मिळवून दिल्याने या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत केले जात आहे. मा.आ.पाटील यांच्या पुढाकाराने धुळे तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांना आतापर्यंत तब्बल १७१९ लाभार्थ्यांना मोफत हयातीचा दाखला तयार करुन देण्यात आला आहे. त्यामुळे लाभार्थ्यांची गैरसोय दूर होवून वेळ व पैसाही वाचला आहे.

**शासकीय योजनांचा लाभ घ्यावा**

शासकीय योजना तळागाळातील माणसापर्यंत पोहचाव्यात म्हणून प्रयत्न करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात कागपत्रांअभावी अनेक लाभार्थी वंचित राहतात. म्हणून शासनाच्या योजनांच्या लाभापासून कोणीही वंचित राहू नये त्यासाठी आमच्या कार्यालयामार्फत दररोज मोफत सेवा आणि मदत केली जाते. कृषी,वैद्यकीय सेवा,विकासात्मक कामे तसेच विविध शासकीय कामे जलद गतीने करण्याचा आमचा प्रयतक असतो, त्यातून गोरगरीब व सर्वसामान्य माणसाला मदत मिळावी हाच एकमेव उद्देश असल्याचे मा.आ. कुणाल पाटील यांनी सांगितले आहे.

## अल्पवयीन बालिकेवर अत्याचाराचे

जुगार अड्डे उध्वस्त करावे. स्वरंक्षणाचे धडे देणारे विशेष कार्यक्रम राबवावे. महिला हेल्पलाईन क्र.११२ चा अधिक प्रसार करावा. भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी व अत्याचार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. अशी मागणी दिक्षा चव्हाण, स्नेहल इंगवले, लताबाई मिस्तरी, अक्काबाई वाघ, विनीता शिंदे, नयना सोनवणे, ज्योती अहिरे यांच्यासह अनेक महिला व पुरूषांनी देखील केली आहे.


## हस्ती वर्ल्ड स्कूलमध्ये शिक्षकपालक समिती

करण्यात आली. त्यात डॉ. दिपाली नागरे, डॉ. निकिता पाटील, पुजा सनेर, पुजा अग्रवाल, कविता जैन, श्रद्धा विंचूरकर, गोसावी माधुरी, प्रिती माखिजा, नितेश माखिजा, प्रशांत ठोंबरे, संजय सोनवणे, ईश्वर भदाणे, अरुण भदाणे, आरती अग्रवाल, कार्तिका महाजन, राहुल पाटील, अनिता मीना, दक्षकुमार मीना या पालकांची सदस्यपदी व शाळेचे शिक्षक सुचेता जाधव व आनंद पवार यांची शिक्षक-पालक समितीच्या सेक्रटरी पदी निवड करण्यात आली.

यावेळी हस्ती गृप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, विद्यार्थीहित व शाळेच्या हितासाठी सर्व पालकांचे मते स्विकारण्यात येतील व पालकांनी केलेल्या विद्यार्थ्यांची विकासात्मक दृष्टीने आपले विचार अंमलबजावणी करण्यात येतील, ग्रामीण भागात जर पालकांनी जबाबदारी घेतली तर हस्ती गृपच्या वतीने ग्रामीण भागातील सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी क्रीडा साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल असे प्रतिपादन केले.

शिक्षकपालक समितीच्या माध्यमातून पालक व शाळा प्रशासन यांच्यात अधिक प्रभावी संवाद निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी परस्पर सहकार्य वाढण्यास मदत होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समन्वयिका समिना बोहरी,सुचेता जाधव, गोरख वाघ, आनंद पवार तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.


प्रकाश में आज पहेलीबार




अमिता भ.सायराबानो विनोद खना, सुलक्षणा पंडीत देवकुमार पद्माखन्ना पिंचु कपूर मोहन शेट्टी अ.


### शब्दकोडे क्रमांक : २४१३



**आडवे शब्द :** १.वृक्ष ३.कंबर ५.लवण ६. कैची ८.भंगारवाला १०. जड १२. विश्रांती १३.पळ १५.रात्री चमकणारा एक जीव १७. एक हिंदी सिनेमा 'काय * छे' १८.एक वाक्य प्रचार '** की पळो करून सोडणे' १९.एक सारखा २२. व्याजाने पैसे देणारा धनी व्यक्ती २४.उभा २६.शिवरायांचा राज्याभिषेक झालेला किल्ला २८.नब-उलट लिहा २९. संवादी-विरुद्ध ३२.जग-विरुद्ध ३३.एक भारतीय जुनी लिपी ३५. चितेवर रचलेली लाकडे ३७.खाऱ्या चवीचा ३८.झाडाचा मुख्य गाभा ३९. इलायची ४१.कन-उलट लिहा ४२. जात,पंथ ४४.मनाचा ओढा ४५.सरिता ४८.मयूर ४९.कशासाठी ५०.आदराने वाकलेला ५२.दुर्ग ५४.हिंदीत-शंभर ५५. वसा,वारसा ५६.उजळणी ५८. दणकट ५९.आनंद ६०.शेत **उभे शब्द : १**. डबा झाकण्यासाठी वापरतात २. जेवणाचे टिफिन ३. लत ५. मासा अखेरची रास ६. तुरुंगवास ७. अंधार ९. इंग्रजीत खूप खोल ११. प्रजा १२. सध्या सुरू असलेला दिवस १४. झाडांची केलेली देखभाल १५.तम १६. रुमाली रोडचा एक प्रकार २०. मृदा २१. घोषणा २२. समुद्र २३. दुधापासून बनवले जाणारे गोड पदार्थ २५. उजवा विरुद्ध २७. मरण देवता ३०. ग्रामीण बोलीत-दिवस ३१. विणकाम करणारा ३३. वळण ३४. अनिल कपूर,अक्षय खन्ना आणि ऐश्वर्या राय यांचा एक सिनेमा ३६. धावणे- इंग्रजीत ३८. गावचा महसूल जमा करणारा एक अधिकारी ३९.लता ४०. भारताच्या शेजारी वसलेला एक देश ४३.भडीमार ४४.रानातील मेवा म्हणून प्रसिद्ध असलेले फळ ४६.सूर्य ४७.एक सुवासिक फूल ५१.ठिकाण ५३. इंग्रजीत-बदक ५६.बनाव ५७.मोन- उलट लिहा

**शब्दकोडे क्रमांक : २४१२ चे उत्तर**









पान १ वरुन

## सोनम वांगचुक यांच्या आंदोलनास व्यापक पाठिंबा

**गेटवर उमटला तीव्र संताप**

गेट मीटिंग दरम्यान गोकुळच्या दोन्ही कार्यालयांच्या प्रवेशद्वारावर कामगार एकत्र आले होते. कामगारांनी संविधान जिंदाबाद, सोनम वांगचुक आगे बढो, हम तुम्हारे साथ है आणि केंद्रीय शिक्षण मंत्री राजीनामा द्या, अशा घोषणा दिल्या. या आंदोलनात शाहीर निकम, अध्यक्ष मल्हार पाटील, अशोक पुणेकर, निवास पाटील, व्ही. डी. पाटील, लक्ष्मण पाटील, दत्ता बच्चे, शहाजी राजे भोसले, योगेश चव्हाण, संभाजी शेलार यांच्यासह संघटनेचे सर्व प्रमुख कार्यकर्ते आणि गोकुळ दूध संघाचे कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**राज ठाकरेंचा पाठिंबा**

भाजपला अमर्याद सत्तेचा माज आला असल्याचे म्हणत राज ठाकरेंनी लिहिले आहे की, सोनम वांगचुक यांच्याबद्दल एकेकाळी भारतीय जनता पक्षाला आस्था होती. सोनम वांगचुक यांना २०१८ साली री-इन्व्हेस्ट कॉन्फरन्सला बोलावून त्यांच्याकडून अपारंपरिक ऊर्जेबद्दल ऐकून घेत कौतुक पण केले. पुढे वांगचुक यांच्या लक्षात आले की यांचे हेतू अजिबात स्वच्छ नाहीत. लडाखला स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळायला हवा, लडाखमध्ये दोन लोकसभा मतदार संघ हवेत. तिथल्या लोकांच्या जमिनीवरचा हक्क राखला गेला पाहिजे या मागण्या वांगचुक यांनी केल्या. त्यासाठी उपोषण, आंदोलने केली पण सरकारने काहीही केले नाही. त्यांना आश्वस्त केले आणि पुढे कृती काहीच नाही. कारण हेतू जे दाखवले जातात तसे कधीच नसतात. आज वांगचुक यांची मागणी नीट परीक्षेचा झालेला गोंधळ आणि तो ज्या व्यक्तीमुळे झाला त्या मंत्र्यांची हकालपट्टी करा आणि या परीक्षांमध्ये पारदर्शकता आणा हीच आहे. यात काहीच वावगे नाही. भाजपच्या सत्तेच्या काळात सर्वत्र परीक्षांमध्ये घोळ होत आलेत असेही राज ठाकरे म्हणाले.

**राजकीय नेते, कलावंतांचा पाठिंबा**

देशभरातून एक हजार आठशे पेक्षा अधिक कलाकार, शिक्षणतज्ज्ञ, लेखक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला असून, आंदोलन सुरू ठेवताना त्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांना केले आहे. वांगचुक यांना पाठिंबा देणाऱ्यांमध्ये अखिलेश यादव - समाजवादी पक्षाचे प्रमुख, ममता बॅनर्जी - तृणमूल काँग्रेस (टीएमसी) प्रमुख, शशी थरूर - काँग्रेसचे खासदार, उद्धव ठाकरे - शिवसेना (यूबीटी) प्रमुख, अरविंद केजरीवाल - आपचे राष्ट्रीय संयोजक, आतिशी - आप नेत्या आणि दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री, महुआ मोइत्रा - टीएमसीच्या खासदार, जॉन ब्रिटास - सीपीआय(एम) राज्यसभा खासदार, सागरिका घोष - टीएमसी राज्यसभा खासदार, प्रिया सरोज - समाजवादी पक्षाच्या खासदार, रोहित पवार - राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) आमदार, साकेत गोखले - टीएमसी नेते, अनिश गावंडे - राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) प्रवक्ते यांचा समावेश आहे. यांच्यासह कला क्षेत्रातील अभिनेते आणि सेलिब्रिटी असलेल्या शबाना आझमी, झीनत अमान, प्रकाश राज, नसीरुद्दीन शाह, रत्ना पाठक-शाह, सोनी राजदान, स्वरा भास्कर, ओमी वैद्य, वीर दास, चिन्मयी श्रीपदा, अरुंधती रॉय यांचा समावेश आहे.

**बोललो म्हणजे देशद्रोह नाही : सोनाक्षी**

मी यापूर्वी कधीही कोणतेही विधान केलेले नाही. पण, आता मी गप्प बसू शकत नाही. सोनम यांच्यासारखी एक प्रतिष्ठित व्यक्ती विद्यार्थ्यांसाठी अठरा दिवसांपासून उपोषण करीत आहे. तरीही सगळे गप्प आहेत. आता मी आवाज उठवणार आहे. आपण बोललो म्हणजे देशद्रोही ठरत नाही. आपल्यालाही आपले मत मांडण्याचा अधिकार असायला हवा. मला भीती वाटत नाही. जे होईल ते पाहू, अशी प्रतिक्रिया अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा यांनी दिली आहे. सरकारने सोनम यांच्याशी चर्चा केली पाहिजे, असेही सोनाक्षी सिन्हा म्हणाली. सोनम वांगचुक यांच्या समर्थनासाठी अधिकाधिक लोक पुढे येत असल्याचेही ती म्हणाली.

**तब्बल ९ किलो वजन घटले**

कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनात सहभागी होऊन सोनम वांगचुक २० जूनपासून जंतर-मंतर येथे उपोषणाला बसले आहेत. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासह परीक्षा पद्धतीत पारदर्शकता आणण्यासाठी त्यांचे हे आंदोलन सुरू आहे. सलग १९ दिवस अन्नत्याग केल्यामुळे वांगचुक यांची प्रकृती कमालीची खालावली आहे. अवघ्या १८ दिवसांत त्यांचे वजन ८.९ किलोने घटून आता ५७.१५ किलोवर आले आहे. डॉक्टरांच्या मते, ते पूर्णपणे शुद्धीवर असले तरी सुरू असलेल्या उपोषणाचा त्यांच्या अंतर्गत अवयवांवर आणि आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे.

**दिल्ली उच्च न्यायालयाचे निर्देश**

दिल्ली उच्च न्यायालयाने जंतर-मंतरवर उपोषणास बसलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या खालावलेल्या प्रकृतीबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. प्रत्येक नागरिकाचे जीवन मौल्यवान असल्याचे नमूद करत न्यायालयाने सरकारी डॉक्टरांना त्यांच्या आरोग्याची दररोज वैद्यकीय तपासणी करण्याचे आणि गरज भासल्यास तातडीने वैद्यकीय मदत देण्याचे निर्देश दिले आहेत. सोनम वांगचुक यांच्या रक्तातील साखरेची पातळी देखील कमी झाली आहे.

## वीज बीलाची माफी अदानीसाठी- सपकाळ

यांनी म्हटलेले आहे. टिळक भवन येथे पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, भाजपा सरकार सर्वच क्षेत्राचे खाजगीकरण करत आहे. आता शिक्षण क्षेत्राचेही खाजगीकरण मोठ्या प्रमाणात करण्याचा डाव आहे म्हणूनच राज्यातील शासकीय शाळा बंद पाडल्या जात आहेत. ज्या शासकीय शाळा अजून आहेत, त्यांना कसल्याच सुविधा नाहीत, वीज नाही, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, स्वच्छतागृह नाहीत, अनेक शाळांमध्ये शिक्षक नाहीत. सरकारला या शाळा सुरु ठेवायच्या नाहीत. शासकीय शाळा बंद पाडून खाजगी कंपन्यांच्या हाती शिक्षण क्षेत्र देण्याचा प्रयतक आहे. शिक्षणाचे खाजगीकरण व बाजारीकरण करून बहुजन समाजातील मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यासाठी हा घाट घातला जात आहे. राज्याला शिक्षण मंत्री आहेत का, हेच समजत नाही. दादा भुसे यांनी कठोर निर्णय घेऊन शासकीय शाळा वाचवल्या पाहिजेत, पण ते फक्त भ्रष्टाचार करत आहेत, असेही सपकाळ म्हणाले.

**मतदारसंघ पुनर्रचना विधेयक देशविरोधी**

मतदार पुनर्रचना विधयेक हे देशाच्या एकतेला धोका पोहचवणारे आहे. या विधेयकामागील भाजपाचा हेतू देशाचे दक्षिण व उत्तर असे दोन तुकडे करण्याचा आहे म्हणूनच संसदेच्या मागील अधिवेशनात हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात पुन्हा हे विधेयक मंजूर करण्याचा आटापिटा भाजपाने सुरु केला आहे, त्यासाठीच तृणमूल काँग्रेस व शिवसेना उबाठा पक्ष पुन्हा एकदा फोडण्यात आला आहे. काँग्रेस पक्षाने या विधेयकावरील आपली भमिका आधीच स्पष्ट केली असून मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाची चिरफाड संसदेत केलेली आहे. भाजपाला वन नेशन वन पॉलिटीकल पार्टी व्यवस्था देशात आणायची आहे, असेही सपकाळ यांनी स्पष्ट केले.

सोनम वांगचुक यांच्याविषयी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, सोनम वांगचुक यांनी ज्या मागण्यासाठी उपोषण सुरु केले आहे, त्याच मागण्यासाठी काँग्रेसने देशव्यापी आंदोलन सुरु केलेले आहे. नीट पेपर लिकचा मुद्दा काँग्रेस पक्षाने लावून धरला असून शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा यासाठी एल्गार पुकारला आहे. राहुल गांधी यांनी छात्रों की गुंज अभियान सुरु केलेले आहे. राजस्थानच्या कोटा शहरातून सुरु केलेल्या अभियनाचा तारखेला डेहराडून येथे कार्यक्रम होत आहे, असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश सरचिटणीस अभिजित सपकाळ उपस्थित होते.

पान १ वरुन

## गंगामाई फार्मसी कॉलेजचा संबंध नाही

हॅकर्सने माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा गैरवापर करून आमच्या नावाने स्कॉलरशिप पोर्टलवर बनावट आयडी तयार करून खोटी माहिती भरली आहे. कॉलेज प्रशासनाला याची कोणतीही माहिती नव्हती. आम्ही कोणतेही बोगस प्रवेश दिलेले नाहीत.

**कोड अहिल्यानगर येथील कॉलेजचा नाव गंगामाई कॉलेजचे**

स्कॉलरशिपवर डल्ला मारणाऱ्या रॅकेटने कॉलेज कोड हा अहिल्यानगर येथील एका कॉलेजचा वापरला आहे. नाव मात्र गंगामाई कॉलेजचे वापरलेले आहे.

**कोणाविरुद्ध गुन्हा ?**

या प्रकरणी जे फरान व मोहम्मद अब्दूल नावाची व्यक्ती, नोडल ऑफीसर म्हणून एमडी अबूल यांच्यासह ४४ बोगस विद्यार्थ्यांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

प्राचार्य डॉ. जगताप यांनी उच्च शिक्षण विभाग जळगावला दिलेल्या पत्रात म्हटलेय, हॅकर्सने शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेले विद्यार्थी आमच्या महाविद्यालयाचे नाहीत. हॅकर्सने हेड ऑफ द इन्स्टिट्यूट म्हणून दाखविलेले जे फरान आणि मोहम्मद अब्दुल हे दोघेही आतापर्यंत कधीही कॉलेजमध्ये कर्मचारी म्हणून नव्हते. हॅकर्सने पोर्टलवर दर्शविलेले कोर्सेस देखील आमच्या महाविद्यालयात कधीही नव्हते. हॅकर्सने दर्शविलेला आयडी आणि पासवर्ड आमचा नाही. आम्हाला आयडी पासवर्ड हा सात फेब्रुवारी २०२४ ला मिळाला आहे.सहसंचालक उच्च शिक्षण विभाग जळगाव यांचे प्रतिनिधी गणेश वळवी यांनी कॉलेजला भेट दिली. तपासणीत शिष्यवृत्तीच्या यादीतील एकही विद्यार्थी महाविद्यालयात आढळून आला नसल्याचे पत्रात नमूद केले आहे.

## वीस जुलैला जि.स्तरीय महिला लोकशाही दिन

संजय पाटील यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविली आहे. समाजातील पीडित महिलांच्या तक्रारी आणि अडचणी शासकीय यंत्रणेकडून तातडीने सोडवल्या जाव्यात आणि त्यांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. तक्रार नोदवण्यासाठी तक्रारदार ज्या महिलांना प्रत्यक्ष येणे शक्य नाही, त्यांनी गुगल मीट लिंकच्या माध्यमातून दुपारी ०१:०० ते ०२:०० या वेळेत ऑनलाईन उपस्थित राहून आपली तक्रार मांडावी. महिला लोकशाही दिनामध्ये मांडण्यात येणारी तक्रार ही केवळ वैयक्तिक स्वरूपाची असावी. न्यायालयीन प्रविष्ट (न्यायप्रविष्ठ), आस्थापना विषयक किंवा सामूहिक स्वरूपाच्या तक्रारी या ठिकाणी स्वीकारल्या जाणार नाहीत, याची सर्व तक्रारदार महिलांनी नोंद घ्यावी, असेही आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्री. पाटील यांनी शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

## सेंधवा येथील पर्यटकांवर पाळणा

मोहम्मद अजहर शेख (वय २४) याच्या डोक्यावर पाईपने वार करण्यात आले, तर अकरम लतीफ कादर (वय ३६) याच्यावर चाकूने सपासप वार झाले. मेहरून बी (वय ५०), लतीफ लाल मोहम्मद (वय ६०) यांच्यासह जोएब शेख (वय १५) या बालकालाही रक्तबंबाळ करण्यात आले.

**पोलिसांच्या भूमिकेवर तीव्र संताप**

आमच्याकडे तिकीट असतानाही वाद उकरून काढला आणि बाहेर येताच संपूर्ण कुटुंबाला संपवण्याचा प्रयत्न झाला. असा संतप्त आरोप जखमी अजहर शेखने केला. धक्कादायक बाब म्हणजे, शिरपूर पोलिसांनी पीडितांना न्याय देण्याऐवजी परस्पर विरोधी (क्रॉस) तक्रार नोंदवून मुख्य गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केल्याचा गंभीर आरोप कुटुंबाने केला आहे. पर्यटकांवर होणाऱ्या अशा हल्ल्यांमुळे शिरपूरच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, पीडित कुटुंबाने आता धुळे पोलीस अधीक्षकांकडे थेट धाव घेत न्यायाची गुहार लावली आहे.

## अमरीशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूलच्या

आक्रमक खेळी, भक्कम बचावफळी, अचूक पासिंग आणि संघभावना यांचा उत्कृष्ट मेळ साधत त्यांनी अंतिम फेरीपर्यंत दमदार मजल मारली. अंतिम सामन्यात दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत झाली. मात्र अमरीशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूलच्या खेळाडूंनी संयम, नियोजन आणि उत्कृष्ट फिटनेसच्या जोरावर संपूर्ण सामन्यात वर्चस्व राखले. प्रशिक्षकांच्या अचूक मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी प्रत्येक संधीचे सोने करत प्रतिस्पर्धी संघावर मात केली आणि जिल्हा विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. या दैदिप्यमान यशामुळे शाळेच्या वर्षांखालील मुलींच्या फुटबॉल संघाची विभागीय स्तरावरील सुब्रोतो फुटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली असून, आता हा संघ विभागीय स्पर्धेत शिरपूर तसेच धुळे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. या निवडीमुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील सातत्यपूर्ण गुणवत्तेला आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीला मोठी दाद मिळाली आहे.

शिरपूर एज्युकेशन सोसायटीत शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा, सांस्कृतिक व व्यक्तिमत्त्व विकासालाही समान प्राधान्य दिले जाते. विद्यार्थ्यांना आधुनिक क्रीडा सुविधा, नियमित सराव, तज्ज्ञ प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि विविध स्पर्धांमध्ये सहभागाची संधी उपलब्ध करून दिली जात असल्याने विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय स्तरावरही उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. या विजयाने संस्थेच्या क्रीडा परंपरेत आणखी एका सुवर्ण अध्यायाची भर पडली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, सर्व विश्वस्त, संस्था डायरेक्टर गिरीजा मोहन, प्राचार्या स्मिता उगले, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी विजेत्या खेळाडू आणि प्रशिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विभागीय स्पर्धेतही संघाने याच जोमाने खेळून शाळेचे व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या. या विजयामुळे शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाप्रती नवीन प्रेरणा निर्माण झाली असून, मुलींच्या फुटबॉल क्षेत्रातील वाढत्या सहभागालाही या यशामुळे मोठी चालना मिळत आहे.

## तापी नदीच्या पात्रात दोघांचे मृतदेह सापडले

मृतदेह बाहेर काढण्यात आला. संदीपच्या मृत्यूची बातमी समजताच अहिल्यापूर आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने शिरपूर पोलीस ठाण्याबाहेर जमा झाले. जोपर्यंत आत्महत्येला कारणीभूत ठरलेल्या संशयितांना अटक केली जात नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही आणि अंत्यसंस्कार करणार नाही, अशी आक्रमक भूमिका नातेवाईकांनी घेतली. दरम्यान, पोलीस प्रशासनाकडून आंदोलकांची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**भांडारकरांची आत्महत्या**

धुळ्यातील महिंदळे शिवारातील इच्छापुर्ती कॉलनीत राहणाऱ्या पन्नास वर्षीय संजय मोतीलाल भांडारकर या व्यक्तीचा मृतदेह सापडला आहे. संजय भांडारकर हे बेपत्ता असल्याची नोंद सहा दिवसांपुर्वी देवपूर पश्चिम पोलिस ठाण्यात झाली होती. आज सकाळी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागास तापीच्या पात्रात त्यांचा मृतदेह असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शिरपूर येथील रूग्णालयात दाखल केला. पण, सहा दिवसांपुर्वी तापीत उडी घेतलेल्या संजय भांडारकर यांचा मृतदेह मोठ्या प्रमाणात कुजला असल्याने त्याचे विच्छेदन करण्यासाठी तो धुळ्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रूग्णालयात दाखल करण्यात आला आहे. पन्नास वर्षीय संजय भांडारकर यांनी आत्महत्या का केली, हे मात्र अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## श्री जगन्नाथ रथयात्रेचे नंदुरबार येथे आयोजन

भोजन प्रसाद तसेच रात्री ८.०० वाजता नाटिका यांचेही आयोजन करण्यात आले आहे.इस्कॉन नंदुरबारच्या वतीने आयोजित या पवित्र सोहळ्यास नागरिकांनी सहकुटुंब व मित्र परिवारासह मोठ्या संख्येने रथयात्रेत सहभागी होवून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## ज्वलनशील पदार्थाच्या टँकरला आग अग्नीशामक दलाची उत्तम कामगिरी

**धुळे, दि. १६ (प्रतिनिधी) : जिल्ह्यातून मार्गस्थ होत असलेल्या सुरत-नागपूर महामार्गावर गुरूवारी पहाटे साडे चारच्या सुमारास डिझेल टँकरला अचानक आग लागली. त्यात टँकर आणि त्यातील ३५ हजार लिटर ज्वलनशील पदार्थ जळाले. आगीत जिवित हानी झाली नाही. महापालिकेच्या अग्नीशामन दलाने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.**



धुळे जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातून मुंबई-आग्रा आणि सुरत-नागपूर हे दोन राष्ट्रीय महामार्ग जातात. या महामार्गावर सतत विचित्र घटना घडत असतात. गुरुवारी पहाटे साडेचारच्या सुमारास अशीच विचित्र घटना घडली. महामार्गावरून ३५ हजार लिटर ज्वलनशील पदार्थ घेऊन गुजरात मधील जामनगर येथून टँकर निघाला होता. टँकर आंध्रप्रदेशातील काकिनाडा येथे जात होता. पहाटे साडेचारच्या सुमारास टँकर धुळे तालुक्यातील नेर गावाजवळ असताना मंजुश्री पेट्रोल पंपाच्या जवळ टँकरला अचानक आग लागली. आग लक्षात येताच चालक, सहचालक टँकर मधून बाहेर पडले आणि सुरक्षित ठिकाणी आश्रयास गेले. टँकरमध्ये ज्वलनशील पदार्थ असल्याने पेट घेतला. काहींनी महापालिकेच्या अग्निशमन केंद्रास माहिती दिली. अग्निशमन विभागाची दोन अग्निशमन वाहने तातडीने घटनास्थळी रवाना झाली. घटनास्थळी लीडिंग फायरमन अमोल सोनवणे, वाहन चालक विजय माळी, गोपाळ माळी तसेच फायरमन संतोष शिरसाठ, योगेश मराठे आणि असलम शहा यांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. पाण्याचा मारा वेळीच झाल्याने अनर्थ टळला.

## निधन वार्ता

### सुमनबाई कासार



सोनगीर, दि.१६- येथील सुमनबाई बाबुलाल कासार यांचे गुरुवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा, सुन, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवारी सकाळी कासार गल्लीतील त्यांच्या राहत्या घरापासून काढण्यात येणार आहे. त्या येथील भांडे व्यवसायिक प्रकाश बाबुलाल कासार यांच्या आई तर वैभव कासार यांच्या आजी होत.

### शंकर सोनवणे



धुळे, दि.१६- सामोडे ता. साक्री येथील मूळ रहिवासी हल्ली ६२ अक्षय कॉलनी वलवाडी देवपूर धुळे येथील शंकर उखा सोनवणे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते. ते कै.तु ता.खलाणे महाजन हायस्कूल, देवपूर धुळे शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी मनोज सोनवणे यांचे वडील होत.

पान १ वरुन

## धुळे जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे

देणाऱ्या खेळाडू, पंच, प्रशिक्षक व कार्यकर्त्यांचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या तांत्रिक समितीवर नियुक्ती झाल्याबद्दल जितेंद्र ठाकरे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच अखिल भारतीय कबड्डी पंच परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल दिलीप सोलंकी व अभय सोनार यांना सन्मानित करण्यात आले.

३६ व्या किशोर गट राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत धुळे जिल्ह्याच्या संघाने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संघ व्यवस्थापक चेतन बिराडे व मार्गदर्शक प्रमोद फुलपगारे यांचा गौरव करण्यात आला. धुळे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे ज्येष्ठ पदाधिकारी डॉ. भालचंद्र मोरे यांच्या सेवानिवृत्तीबद्दल, कबड्डी खेळाडू म्हणून उल्लेखनीय योगदान देत असताना वकीली व्यवसायात यशस्वी वाटचाल करणारे ॲड. प्रथमेश सोनार व ॲड. पुष्पक श्रीखंडे यांचाही विशेष सत्कार मा.आ.कदमबांडे यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमानंतर धुळे जिल्हा कबड्डी असोसिएशनशी संलग्न असलेल्या सर्व कबड्डी मंडळांचे अध्यक्ष व सचिव यांची सहविचार सभा घेण्यात आली. तसेच धुळे जिल्हा पंच मंडळाची बैठकही पार पडली. बैठकीत जिल्ह्यात कबड्डीचा अधिक व्यापक प्रचार-प्रसार, ग्रामीण भागातील प्रतिभावान खेळाडूंना संधी, पंच व प्रशिक्षकांची गुणवत्ता वाढविणे, तसेच वर्षभर होणाऱ्या विविध स्पर्धांचे नियोजन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. आगामी स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व मंडळांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी धुळे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सचिव मुजफ्फर अली सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल शेख, बंटी मोरे, नरेंद्र नगराळे, दिलीप सोलंकी, अभय सोनार, शरद फुलपगारे, सुमित आढाव, ॲड. प्रथमेश सोनार, भूषण बोरसे, रोहित सोनवणे, कल्पेश शिंदे व प्रतीक घटी यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यात कबड्डी खेळाच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला असून, नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देत कबड्डीचा प्रसार व विकास अधिक व्यापक करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

**पाहिजेत**
मेस कामासाठी कायमस्वरूपी महिला लावणे आहे. (जागा-२). अनुभव असल्यास प्राधान्य
9823382447
9511859761

**घर व शेती विकणे**
घर व शेती विकणे आहे. गं.नं. ७ येथील सिटी सर्वे. नं. २२१९ येथील ८X५०= ४०० स्केअर फूट व अंबोडे येथील शेती ३ बिगे विकणे आहे.
- संपर्क -
9595606474
9923113130

डी. पी. इंजिनिअर्स
BOSCH Invented for life
सुप्रसिद्ध बॉश कंपनीचे
वायपर ब्लेड्स
10% सूट
असल बॉश पार्ट्स | उच्च गुणवत्ता | वाजवी दरात हमखास समाधान
58 वर्षांपासून विश्वसनीय सेवा...
डी. पी. इंजिनिअर्स
अधिकृत बॉश डिझेल सर्व्हीस- A.7 उद्योग नगर, मुंबई आग्रा रोड, धुव होंडा शोरूमच्या बाजूला, धुळे
Cell: 94030 88893 / 94222 89693

**पाहिजेत**
१०वी, १२वी पास असलेली हुशार व अनुभवी मुले लावणे आहेत. जागा -५ मुले
-: संपर्क :-
सोमनाथ ओनियन सप्लायर्स
दु.नं.५, कॉटन मार्केट यार्ड, पारोळा रोड, धुळे
9604090099
9420005990

**पाहिजेत**
आर.एम.ओ
नर्सिंग स्टाफ (ब्रदर-सिस्टर)
ओ.टी.असीस्टंट
वार्डबॉय
स्वयंपाकासाठी महिला
वॉचमन
अर्जासह समक्ष भेटणे
निरामय हॉस्पीटल
८० फुटी रोड, धुळे

**मुले पाहिजेत**
१ ग्राफिक्स् डिझायनर व डि.टी.पी. ऑपरेटर मुलगा पाहिजे. मराठी टायपिंग येणे आवश्यक. (अनुभव आवश्यक)
१ बाईंडर (अनुभव आवश्यक)
२ हेल्पर व ऑपरेटर (कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक)
अर्जासह भेटा
नहुष डिजिटल प्रिंटर्स, धुळे
9028921347
8788942027

**डिटीपी ऑपरेटर पाहिजेत**
इनडिझाईनमधे काम करु शकणारा डिटीपी ऑपरेटर चांगल्या पगारावर नेमणे आहे.
-: संपर्क :-
दै.आपला महाराष्ट्र
9422286496

**भाड्याने देणे आहे**
जे.बी.रोड, धुळे आकाश हॅण्डलुम समोरील ११X१०० फुट
- संपर्क -
7499824718
9764131189

**ड्रायव्हर पाहिजे**
हुशार, होतकरु, अनुभवी व निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे.
समक्ष भेटा
- संपर्क -
9823178279

**Wanted**
Pharmacist 1 Year Experience Holer (P.c.Handaling, customer Handaling)
- Contact -
9823833108

आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...
atomberg "Why not?"
क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है, जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमें 75 वॉट बिजली की खपत होती है.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती है. इससे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरुरत नहीं होती है !
SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोनः 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०